# पाठ फिरवणारा पाऊस

## स्वाध्याय

### परिच्छेद १

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४१ वरील (ओळ १ ते १३) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|'रम्य ते बालपण' .......................

....................... पुराचे पाणी पाहण्यासाठी|

अ. आकलन

### कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. उन्हाळ्यातच कोसळणारा.


२. सोसाट्याच्या वाऱ्या-वावधानासह येणारा.

३. आंब्यांची नासाडी करणारा.

४. मृगाच्या दिवशी विजांसह बरसणारा.

५. श्रावणातली झिमझिम.

### कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. गती २. वेग ३. आवाज

## कृ.३. चौकट पूर्ण करा.

१. अवकाळी पावसाने यांची नासाडी होते → [ ]

२. पाऊस थांबल्यावर लेखक यासाठी नदीवर जात असत → [ ]

**उत्तर:** १. आंब्यांची

२. पुराचे पाणी पाहण्यासाठी

## कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. कधी कधी पाऊस ________

अ. यायचाच नाही.

ब. दिवसभर यायचा.

क. रात्रीच्या मुक्कामाला यायचा.

ड. अवकाळी यायचा.

२. पुन्हा आपल्या पूर्वगतीने त्याचे ________

अ. कोसळणे चालू व्हायचे.

ब. बरसणे चालू व्हायचे.

क. रिमझिमणे सुरू व्हायचे.

ड. टपकणे सुरू व्हायचे.

**उत्तर:** १. कधी कधी पाऊस **रात्रीच्या मुक्कामाला यायचा.**

२. पुन्हा आपल्या पूर्वगतीने त्याचे **कोसळणे चालू व्हायचे.**

## कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

१. लेखकाला बालपणाचा पाऊस रमणीय वाटायचा.

२. लेखकाच्या आठवणीतला पाऊस फक्त 'रिमझिम' बरसणाराच होता.

३. आंब्यांची नासाडी करणारा पाऊस अवकाळी असायचा.

४. प्रचंड वेगाने वाहणारे पुराचे पाणी पाहण्यासाठी लेखक व त्याचे दोस्त नदीकडे पळत.

**उत्तर:** १. सत्य     २. असत्य

३. सत्य     ४. सत्य

कृ.६. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | आंब्यांची नासाडी करणारा | अ. | विजांसह बरसणारा पाऊस |
| २. | मृगाच्या दिवशी | ब. | झिमझिम |
| ३. | श्रावणातली | क. | अवकाळी पाऊस |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

कृ.७. प्रश्न तयार करा.

१. 'रमणीय' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'नदी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लेखकाचे बालपण कसे नाही?

२. पावसाने विश्रांती घेतल्यावर लेखक कशाकडे पळत असत?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. बालपण : लहानपण : : वर्षा : ☐

२. विसावा : विश्रांती : : वावटळ : ☐

**उत्तर:** १. पाऊस २. वावधान

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

पावसाची अखंड धार : ☐

**उत्तर:** संततधार

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. मुसळधार, अवकाळी, संततधार, झिमझिम

२. सकाळ, दुपार, दिवस, रात्र

**उत्तर:** १. अवकाळी २. दिवस

**कृ.४. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

**पूर्वगतीने चालू राहणे** : एखादी गोष्ट क्षणिक बदलानंतर पुनश्च पहिल्यासारखी सुरू होणे.

**वाक्य:** वडिलांच्या मृत्यूनंतर खचलेल्या आशाचे दैनंदिन जीवन थोड्याच काळात **पूर्वगतीने चालू झाले.**

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. गती : ☐ ☐

२. पूर्व : ☐ ☐

**उत्तर:** १. गतिरोधक, गतिमान

२. पूर्वदिशा, पूर्वस्थिती

**कृ.६. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

नदीला पूर आला आणि ________

**उत्तर:** १. नदीला पूर आला आणि **आम्ही बचतकार्यासाठी धावून गेलो.**

२. नदीला पूर आला आणि **आमच्या शेतात, घरात पाणी शिरून प्रचंड नुकसान झाले.**

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. खालील वाक्यातील क्रियापद ओळखा.**

पावसाची कितीतरी रूपं मी तेव्हा अनुभवली.

**उत्तर:** अनुभवली

**कृ.२. खालील शब्दांचे सामन्यरूप, विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | पूर्वगतीने | | | |
| २. | आंब्यांची | | | |
| ३. | मुक्कामाला | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | पूर्वगतीने | पूर्वगती | ने | तृतीया |
| २. | आंब्यांची | आंब्यां | ची | षष्ठी |
| ३. | मुक्कामाला | मुक्कामा | ला | द्वितीया /चतुर्थी |

**कृ.३. खालील वाक्यांतील अव्यय ओळखून प्रकार लिहा.**

१. पावसाची कितीतरी रूपं मी तेव्हा अनुभवली.

**उत्तर:** तेव्हा - क्रियाविशेषण अव्यय

२. कधी कधी पाऊस रात्रीच्या मुक्कामाला यायचा.

**उत्तर:** कधी कधी - क्रियाविशेषण अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. अवकाळ        २. पूर्वगती

३. संततधार

**उत्तर:**

| | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|---|
| १. | अवकाळ | अव (वाईट) असा काळ | कर्मधारय समास |
| २. | पूर्वगती | पूर्व (पूर्वीची) गती | कर्मधारय समास |
| ३. | संततधार | सतत अशी धार | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. पावसाची कितीतरी रूपं मी तेव्हा अनुभवली.

**(उद्‌गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती रूपं अनुभवली मी तेव्हा पावसाची !

२. संततधार पाऊस सुरू असायचा. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** संततधार पाऊस सुरू नसायचा का?

**कृ.६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

मग आम्ही सारे नदीकडे पळत असू.

**उत्तर:** मग **मी** नदीकडे पळत **असे**.

**कृ.७. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. पण पुन्हा आपल्या पुर्वगतीने त्याचे कोसळणे चालु व्हायचे.

**उत्तर:** पण पुन्हा आपल्या **पूर्वगतीने** त्याचे कोसळणे **चालू** व्हायचे.

२. कधी कधी पाऊस रात्रिच्या मुकामाला यायचा.

**उत्तर:** कधी कधी पाऊस **रात्रीच्या मुक्कामाला** यायचा.

**कृ.८. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. रम्य ते बालपण म्हटले जाते पण माझे बालपण काही रमणीय नाही.

**उत्तर:** 'रम्य ते बालपण' म्हटले जाते; पण माझे बालपण काही रमणीय नाही.

२. या पावसाचा विशेष असा असायचा की त्याची गती वेग आणि आवाज तीन तीन दिवस सारखाच असायचा.

**उत्तर:** या पावसाचा विशेष असा असायचा, की त्याची गती, वेग आणि आवाज तीन-तीन दिवस सारखाच असायचा.

**ड. माझे मत**

**कृ.१. तुमच्या बालपणीच्या सुखद आठवणी सांगा.**

**उत्तर:** 'रम्य ते बालपण' असे म्हणतात ते काही खोटे नाही. माझ्या बालपणीच्या आठवणी आजही माझ्या नजरेसमोर आहेत. माझे बालपण चाळीत गेले. तेथील आठवणी म्हणजे खजिना आहे. आसपास माझ्या वयाची अनेक मुले असल्याने पूर्ण दिवस खेळण्यात निघून जाई. चाळीचे आवार मोठे असल्याने अनेक मैदानी खेळ मी लहानपणापासून खेळू लागले. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे अनेक थोरामोठ्यांचे संस्कार माझ्यावर झाले. गोष्टी सांगण्यासाठी खूप आजीआजोबा मला लाभले. अनेक सण आम्ही एकत्र साजरे केले. होळीतील नारळ, दिवाळीचे फटाके, रंगपंचमीचे रंग, गणपतीतील मोदकांवर ताव, नवरात्रीतील आरत्या, चाळीतील पूजा, गुणदर्शन सोहळा, त्यातून कलागुणांना वाव मिळणे व नवीन कलांची ओळख या सगळ्यांमुळे माझे बालपण अतिशय संस्मरणीय झाले आहे.

## परिच्छेद २

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४१-४२ वरील


(ओळ १३ ते २४) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|हा पूर र पाहण्यात ......................

...................... चालणारा मुसळधार पाऊस.|


अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. अद्‌भुत २. रोमांचकारी

कृ.२. शब्दजाल पूर्ण करा.



**उत्तर:** १. मोठमोठी खोडं  २. झाडांच्या फांद्या
३. घराचे वास  ४. मोठे मोठे साप
५. लाकडं

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखक तासन्तास हे पाहण्यात घालवत** → [ ]

२. **पुरात उडी टाकणारे लोक ताकदीने एवढे अंतर कापत** → [ ]

**उत्तर:** १. अतिशय वेगाने दुथडी भरून वाहणारे पाणी
२. मैल - दोन मैल

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. त्याची पुराच्या ______
अ. आवेगापासून सुटका व्हायची.
ब. तडाख्यातून सुटका व्हायची.
क. प्रकोपातून सुटका व्हायची.
ड. पाण्यापासून सुटका व्हायची.

२. इतर महत्त्वाच्या वस्तू पकडणारे काही ______
अ. मर्द गडी असत.
ब. नावाडी असत.
क. विद्यार्थी असत.
ड. तरबेज लोक असत.

**उत्तर:** १. त्याची पुराच्या **तडाख्यातून सुटका व्हायची.**
२. इतर महत्त्वाच्या वस्तू पकडणारे काही **तरबेज लोक असत.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाला पूर पाहण्यात एक अद्‌भुत व रोमांचकारी आनंद वाटत असे.

२. पुराच्या पाण्यातून असंख्य वस्तू- साप, खोडं, झाडांच्या फांद्या वाहत जात.

३. पुरातून वाहणाऱ्या महत्त्वाच्या वस्तू पकडणारे तरबेज लोक पुरात उड्या टाकत.

४. पुरात उड्या टाकणाऱ्या मर्द गड्यांना पाहण्याची लेखकाला भीती वाटायची.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

'किनारा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** पुराच्या पाण्यातील एखाद-दुसरा साप कोठे आदळायचा?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

१. असंख्य : [ ]

२. झाड : [ ]

**उत्तर:** १. अगणित २. वृक्ष

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. मोठे × [ ]

२. अटक × [ ]

**उत्तर:** १. लहान २. सुटका

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. दोन्ही काठांपर्यंत भरून वाहणारा : [ ]

२. घराच्या छताला आधार देणारे लाकूड : [ ]

**उत्तर:** १. दुथडी २. वासा

**कृ.४. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

वेग, आवेग, तडाखा, पूर

**उत्तर:** पूर

कृ.५. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.

मुसळ [ ] दार

उत्तर: मुसळधार, धारदार

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | विशेषणे | | विशेष्ये |
|---|---|---|---|
| १. | मोठे | अ. | आनंद |
| २. | मुसळधार | ब. | साप |
| ३. | तरबेज | क. | पाऊस |
| ४. | रोमांचकारी | ड. | लोक |

उत्तर: (१ - ब),(२ - क),(३ - ड),(४ - अ)

कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | पुराच्या | | |
| २. | वेगाने | | |
| ३. | पुरात | | |
| ४. | गड्यांना | | |

**उत्तर:**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | पुराच्या | च्या | षष्ठी |
| २. | वेगाने | ने | तृतीया |
| ३. | पुरात | त | सप्तमी |
| ४. | गड्यांना | ना | द्वितीया / चतुर्थी |

**कृ.३. वाक्यांतील अधोरेखित अव्ययांचा प्रकार ओळखा.**

१. कुठून कुठून असंख्य वस्तू अतिशय वेगाने वाहत यायच्या.

**उत्तर:** कुठून कुठून, अतिशय – क्रियाविशेषण अव्यय

२. त्यातूनही एखाद-दुसरा साप किनाऱ्यावर येऊन आदळायचा आणि त्याची पुराच्या तडाख्यातून सुटका व्हायची.

**उत्तर:** किनाऱ्यावर – शब्दयोगी अव्यय

आणि – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

तासन्तास

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| तासन्तास | प्रत्येक तासाला | अव्ययीभाव समास |

**कृ.५. खालील वाक्यांचा काळ ओळखा.**

१. पाण्यातून असंख्य मोठे मोठे साप वाहत जाताना दिसत असत.

**उत्तर:** अपूर्ण भूतकाळ

२. अशा मर्द गड्यांना पाहण्याची काही और मजा होती.

**उत्तर:** साधा भूतकाळ

**कृ.६. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**

**(विधानार्थी, प्रश्नार्थी, नकारार्थी)**

१. ते सांगता यायचे नाही.

**उत्तर:** नकारार्थी

२. ते पाहता पाहता त्या पुरात उड्या टाकत.

**उत्तर:** विधानार्थी

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. असख्य | असंख्य | अंसख्य | असन्ख्य

२. अद्भूत | अदभुत | अद्भुत | अदभूत

**उत्तर:** १. असंख्य २. अद्भुत

**कृ.८. चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. मोठमोठी खोडं; झाडांच्या फांद्या; क्वचित एखाद्या वेळी कुठे तरी वाहून गेलेल्या घराचे वासे आणि काय काय असेल! ते सांगता यायचे नाही!

**उत्तर:** मोठमोठी खोडं, झाडांच्या फांद्या, क्वचित एखाद्या वेळी कुठे तरी वाहून गेलेल्या घराचे वासे आणि काय काय असेल, ते सांगता यायचे नाही.

२. तर असा हा तीन तीन; चार चार दिवस चालणारा मुसळधार पाऊस?

**उत्तर:** तर असा हा तीन तीन-चार चार दिवस चालणारा मुसळधार पाऊस!

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्ही कधी पुराचा अनुभव घेतला आहे का? त्याचे वर्णन करा.**

**उत्तर:** पावसाळा हा खरे पाहता सगळ्यांचा आवडता ऋतू. पण या पावसाने जर उग्र रूप धारण केले, तर तो काय प्रकोप घडवू शकतो ह्याचे दर्शन अनेकांनी २६ जुलै, २००५ रोजी आलेल्या पुरामुळे घेतले. त्यावर्षी मी केवळ ५ वर्षांची होते; पण आजुबाजूला सुरू झालेला हाहाकार मात्र मला पूर्ण समजत होता. सतत कोसळणाऱ्या पावसाने सगळीकडे पाण्याचे साम्राज्य पसरवले होते. बदलापूरमध्ये असलेली आमची दुमजली चाळ थोडी उंच भागात असूनही तळमजला पूर्ण पाण्याखाली गेला होता. आमचे घर दुसऱ्या मजल्यावर असल्याने अनेक तळमजल्यावरील लोक आमच्या घरी आश्रयाला आले होते. रेल्वे बंदच होती. अनेकांचे नातेवाईक कुठेकुठे अडकले होते. त्याहूनही भयानक स्थिती पाऊस ओसरल्यानंतरची होती. सगळीकडे चिखलाचे व घाणीचे साम्राज्य होते. घरांचे, वस्तूंचे, दुकानांचे प्रचंड नुकसान झाले होते. तो दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातील आजपर्यंतचा काळा दिवस म्हणता येईल.

## परिच्छेद ३


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४२ वरील (ओळ २५ ते ४०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[पावसाळ्याची सगळ्यात मजा ......................**

**...................... हा पहिला दुष्काळ होता.]**

## अ. आकलन

कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर:

१. मजा वाटायची.

२. भिंतींना ओल चढायची.

३. छपरांमधून पाणी गळायचे.

४. उपासमारीची पाळी यायची.

५. घरातून बाहेर पडणे अशक्य व्हायचे.

**कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.**

**१९७१ साली झालेली स्थिती**

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

**पुढची दोन-तीन वर्षे पाऊसच पडला नाही**

**उत्तर:** १. ढग दाटून यायचे.

२. पाऊस पडेल असे वाटायचे.

३. सगळा पावसाळा संपला.

४. पण पाऊसच पडला नाही.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**

१ ← **दुष्काळाने होरपळून निघालेला भाग** → २

**उत्तर:** १. अख्खा मराठवाडा

२. महाराष्ट्राचा काही भाग

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखकाला अपरिहार्य वाटणारी अवस्था** → 

२. **अतिशय भयानक अशी गोष्ट** → 

**उत्तर:** १. 'नेमेचि येतो मग पावसाळा'.

२. पुढची दोन-तीन वर्षे पाऊस न पडणे

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. आतापर्यंत माझा समज होता, की जून उजाडला, की ________

अ. शाळा सुरू होतेच.

ब. पावसाळा सुरू होतोच.

क. पाऊस सुरू होतोच.

ड. थंडी सुरू होतेच.

२. माझ्या आयुष्यात अनुभवलेला हा ________

अ. पहिला दुष्काळ होता.

ब. पहिला पाऊस होता.

क. पहिला पूर होता.

ड. संस्मरणीय पाऊस होता.

**उत्तर:** १. आतापर्यंत माझा समज होता, की जून उजाडला, की **पाऊस सुरू होतोच.**

२. माझ्या आयुष्यात अनुभवलेला हा **पहिला दुष्काळ होता.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखकाला पावसाळ्यात आठ-दहा दिवस लागणारी झड अनुभवणे मजेदार वाटायचे.

२. मोलमजुरी करणाऱ्यांना पावसाळ्यातली झड फार आनंददायक वाटायची.

३. लेखकाच्या आयुष्यात त्याने अनुभवलेला १९७१ सालचा हा पहिलाच दुष्काळ होता.

४. संपूर्ण मराठवाडा व महाराष्ट्राचा काही भाग १९६० च्या दुष्काळात होरपळला.

**उत्तर:** १. सत्य  २. असत्य

३. सत्य  ४. असत्य

**कृ.७. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | समृद्ध पावसाळा | अ. | दुष्काळाची सुरुवात |
| २. | जून महिना | ब. | बालपण रमणीय |
| ३. | १९७१ साल | क. | पावसाची सुरुवात |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.८. प्रश्न तयार करा.**

१. 'उपासमारी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'जून' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. पावसामुळे मोलमजुरीवर पोट असणाऱ्यांवर कोणती वेळ यायची?

२. लेखकाच्या मते कोणता महिना उजाडला, की पाऊस सुरू होतो?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| सावकाश | त्रासदायक | गृह | मेघ | नभ |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |

उत्तर: १. संथ २. जाचक

३. घर ४. ढग

५. आकाश

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

सतत कोसळणारा पाऊस : ☐

उत्तर: झड

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. भिंती, चिखल, छप्पर, घर

२. ढग, आकाश, बालपण, पाऊस

उत्तर: १. चिखल २. बालपण

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

१. ओलावा टिकून असणे :

अ. घरात ओल असणे.

ब. आठवणी तशाच असणे.

क. वस्तू ओल्या होणे.

ड. सतत ओले राहणे.

२. होरपळून निघणे:

अ. भयानक आग लागणे.

ब. भयानक भाजणे.


क. पळून जाणे.

ड. भयानक त्रासातून जाणे.

**उत्तर:** १. आठवणी तशाच असणे.


२. भयानक त्रासातून जाणे.

**कृ.५. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




**उत्तर:** उपास, मास, सरी, पारी, उरी

कृ.६. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.




**उत्तर:** तास

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील नाम ओळखा.**

माझ्या आयुष्यात अनुभवलेला हा पहिला दुष्काळ होता.

**उत्तर:** नाम – आयुष्य, दुष्काळ

**कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | पावसाने | अ. | सप्तमी |
| २. | आयुष्यात | ब. | षष्ठी |
| ३. | महाराष्ट्राचा | क. | तृतीया |
| | | ड. | चतुर्थी |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

**कृ.३. वाक्यांतील अव्यय ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

१. पावसाची सगळ्यात मजा यायची, ती झड लागल्यावर.

**उत्तर:** सगळ्यात – क्रियाविशेषण अव्यय

लागल्यावर – शब्दयोगी अव्यय

२. बघता बघता सगळा पावसाळा संपला, पण पाऊस पडला नाही.

**उत्तर:** पण – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. महाराष्ट्र २. दुष्काळ

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र | महान असे राष्ट्र | कर्मधारय समास |
| २. | दुष्काळ | दु:(वाईट)असा काळ | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. सगळा पावसाळा संपला, पण पाऊसच पडला नाही.

**(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** सगळा पावसाळा संपला, पण पावसाने दडी मारली.

२. पुढची दोन-तीन वर्षे पाऊसच पडला नाही.

**(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** पुढची दोन-तीन वर्षे पाऊस पडलाच कुठे?

**कृ.६. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. सम्रुद्ध २. विश्‍वासघात

३. महाराश्ट्र ४. दूष्काळ

**उत्तर:** १. समृद्ध २. विश्वासघात

३. महाराष्ट्र ४. दुष्काळ

**कृ.७. विरामचिन्हे व त्यांच्या नावांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | विरामचिन्हे | | नावे |
|---|---|---|---|
| १. | ' ' | अ. | उद्‌गारवाचक चिन्ह |
| २. | , | ब. | पूर्णविराम |
| ३. | ! | क. | स्वल्पविराम |
| ४. | . | ड. | एकेरी अवतरणचिन्ह |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - अ), (४ - ब)

**ड. माझे मत**

**कृ.१. तुमच्या लहानपणी पावसाळ्यात केलेली मजा तुमच्या शब्दात सांगा.**

उत्तर: जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच वेध लागतात ते दोन गोष्टींचे. एक म्हणजे 'शाळा' आणि दुसरी म्हणजे 'पावसाळा'. माझ्या लहानपणीचा पावसाळा म्हणजे गमतीदार आठवणी. 'येरे येरे पावसा' म्हणत पावसाची वाट बघताना आकाशात काळ्या ढगांची गर्दी होते. टपोरे थेंब मातीत पडताच येणारा मातीचा सुगंध हवासा वाटतो. दरवर्षी पावसाळा येताच रेनकोट, पावसाळी चप्पल, छत्री, दप्तराला प्लास्टिकचे कव्हर या गोष्टींची तयारी करतात आजही फार मजा येते. लहानपणी पावसाचे पाणी साठलेल्या ठिकाणी उड्या मारण्याचा आमचा खेळ रंगात येई. कागदी होड्या सोडण्यासाठी, पावसाचे पाणी जमा करण्यासाठी आम्ही मुले डबके तयार करत असू. खूप जास्त पाऊस पडून शाळेला सुट्टी मिळावी, यासाठी आम्ही करत असलेली प्रार्थना मला आठवते. थंडगार वातावरणात गरमागरम पिठलं भाकरी, कांदाभजी यांच्यावर मारलेला ताव आणि त्या पदार्थांची चव, या आणि अशा अनेक सुखद आठवणी दरवर्षीचा पाऊस देऊन जातो.

## परिच्छेद ४


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४२ वरील (ओळ ४० ते ५०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|महाराष्ट्रात यापूर्वी ......................

...................... कमी होऊन गेलेला आहे.|


अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. गावातील प्रतिष्ठित २. शिक्षक


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. जुलै २. ऑगस्ट

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१.




२.




**उत्तर:** १. एकोणीसशे बावन्न साली

२. वरचेवर पावसाचे प्रमाण कमी होणे

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. खेड्यापाड्यांतून बीडला शिकायला आलेल्या पोरांना ________

अ. घरी जाण्याशिवाय काही मार्ग नव्हता.

ब. रडत राहण्याशिवाय काही मार्ग नव्हता.

क. उपाशी राहण्याशिवाय काही मार्ग नव्हता.

ड. शाळा सोडण्याशिवाय काही मार्ग नव्हता.

२. गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये पाऊस अतिशय ________

अ. वाढला आहे.

ब. कमी होऊन गेलेला आहे.

क. जास्त होऊन गेलेला आहे.

ड. थोडा होऊन गेलेला आहे.

उत्तर: १. खेड्यापाड्यांतून बीडला शिकायला आलेल्या पोरांना **उपाशी राहण्याशिवाय काही मार्ग नव्हता.**

२. गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये पाऊस अतिशय **कमी होऊन गेलेला आहे.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. १९५२ साली महाराष्ट्रात मोठा सुकाळ होता.

२. दुष्काळात लेखकाच्या कुटुंबाने बरबडा खाऊन जीवन व्यतीत केले होते.

३. जालना जिल्ह्यांत शिकायला आलेल्या मुलांना उपासमारीला तोंड द्यावे लागले.

४. १९७१ सालचा दुष्काळ पाच वर्षे चालला.

उत्तर: १. असत्य २. सत्य

३. असत्य ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'बरबडा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'दुष्काळी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

उत्तर: १. लेखकाचं कुटुंब दुष्काळात काय खाऊन जगलं होतं?

२. बीड हा जिल्हा कसा म्हणून ओळखला जातो?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लिहून कोष्टक पूर्ण करा.

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | | दुष्काळ | |
| २. | | पहिला | |
| ३. | | शिक्षक | |

उत्तर:

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | अवर्षण | दुष्काळ | पूर |
| २. | प्रथम | पहिला | अंतिम |
| ३. | गुरू | शिक्षक | विद्यार्थी |

कृ.२. शब्दसमूह व शब्द यांच्या जोड्या जुळवा.

| | शब्दसमूह | | शब्द |
|---|---|---|---|
| १. | चांगली आठवण | अ. | बरबडा |
| २. | नावाजलेले लोक | ब. | सुवर्णस्मृती |
| ३. | वेगवेगळ्या पाल्यांपासून बनवलेली भाजी | क. | दुष्काळ |
| ४. | पाऊस न पडल्याने निर्माण होणारी स्थिती | ड. | प्रतिष्ठित |

उत्तर: (१ - ब), (२ - ड), (३ - अ), (४ - क)

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

पुणे, महाराष्ट्र, बीड, मुंबई

**उत्तर:** महाराष्ट्र

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. महा : ☐ ☐

२. मेघ : ☐ ☐

**उत्तर:** १. महाराष्ट्र, महागायक

२. मेघराज, मेघदूत

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. दिलेल्या शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप शोधून लिहा.**

१. दुष्काळ　　२. प्रतिष्ठित

३. आयुष्य　　४. खेडे

**उत्तर:** १. दुष्काळा　　२. प्रतिष्ठितां

३. आयुष्या　　४. खेड्यां

**कृ.२. खालील अव्यये आणि अव्यय प्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | अव्यय | | अव्यय प्रकार |
|---|---|---|---|
| १. | काल | अ. | उभयान्वयी अव्यय |
| २. | पासून | ब. | क्रियाविशेषण अव्यय |
| ३. | म्हणजे | क. | शब्दयोगी अव्यय |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.३. दिलेल्या सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

सुवर्णस्मृती

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| सुवर्णस्मृती | सुवर्णासारखी स्मृती | कर्मधारय समास |

**कृ.४. कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्यांचा प्रकार ओळखा.**

**(उद्गारार्थी, नकारार्थी, विधानार्थी)**

१. पण त्या दुष्काळाचं मला फारसं काही आठवत नाही.

**उत्तर:** नकारार्थी

२. ही एक या काळातील माझ्या आयुष्यातली सुवर्णस्मृती!

**उत्तर:** उद्गारार्थी

३. माझ्या आयुष्यातला हा पहिला दुष्काळ होता.

**उत्तर:** विधानार्थी

**कृ.५. खालील शब्दांचे लिंग बदला.**

१. शिक्षक २. पोरे

**उत्तर:** १. शिक्षिका २. पोरी

**कृ.६. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रतीष्ठित | प्रतीष्ठीत | प्रतश्ठित | प्रतिष्ठित |
| २. | सूवर्णस्मृती | सुवर्णस्मृती | सुवर्णस्म्रुती | सुवर्णस्मृति |

**उत्तर:** १. प्रतिष्ठित २. सुवर्णस्मृती

**कृ.७. खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा.**

१. 'मेघराजा पाणी दे' अशा कित्येक प्रार्थना कोरड्या गेल्या.

**उत्तर:** (' ') - एकेरी अवतरण चिन्ह

(.) - पूर्णविराम

२. असंख्य कुटुंबे पुणे, मुंबईला गेली.

**उत्तर:** (,) - स्वल्पविराम

(.) - पूर्णविराम

ड. माझे मत

**कृ.१. 'दुष्काळाचे ग्रामीण भागातील जीवनावर होणारे परिणाम' यावर तुमचे मत थोडक्यात मांडा.**

उत्तर: दरवर्षी कमी होत जाणाऱ्या पावसामुळे आपल्या देशात दुष्काळ पडण्याचे प्रमाण वाढत आहे. दुष्काळामुळे शेतीवर फार मोठा दुष्परिणाम होतो. पाण्याअभावी शेतकरी शेत पिकवू शकत नाही व त्यामुळे फार मोठ्या संख्येवरील लोकांचे उत्पन्न घटते शेतकऱ्यांबरोबरच शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांचाही रोजगार व उत्पन्न बंद होते. जसजशा गावातील नद्या, तलाव, विहिरी आटत जातात, भूजल खालावते; तसतशी पिण्याच्या पाण्याची चिंता भेडसावू लागते. बायकांना मैलोन् मैल चालून पाणी आणावे

## परिच्छेद ५


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४२ वरील (ओळ ५० ते ५८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

।पूर्वीही दुष्काळ पडत ......................

...................... खरी असावी असे वाटते.।

अ. आकलन


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. पावसाचे प्रमाण कमी.

२. पाण्याचा ऐशआरामासाठी वाढता वापर.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. पूर्वीच्या अतिवृष्टीच्या ठिकाणांचा पाऊस कुठे गेला?

२. कुणी घालवला हा पाऊस?

## कृ.३. चौकट पूर्ण करा.

१. **पाऊस थांबवण्यासाठी योजला जाणारा उपाय** → [ ]

२. **पाऊस येईनासा होण्याचे कारण** → [ ]

**उत्तर:** १. पाऊस पोळवणे.

२. प्रचंड प्रमाणातील वृक्षतोड.

## कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. आता मात्र मार्चपासूनच प्यायचे पाणी असंख्य ________

अ. गावांना मिळेनासे होते.

ब. खेड्यांना मिळेनासे होते.

क. शहरांना मिळेनासे होते.

ड. लोकांना मिळेनासे होते.

२. आजही जिथं प्रचंड वृक्ष आहेत, तिथं भरपूर ________

अ. सावली पडतेच.

ब. प्राणी आढळतातच.

क. हिरवळ आढळतेच.

ड. पाऊस पडतोच.

**उत्तर:** १. आता मात्र मार्चपासूनच प्यायचे पाणी असंख्य **खेड्यांना मिळेनासे होते.**

२. आजही जिथे प्रचंड वृक्ष आहेत, तिथं भरपूर **पाऊस पडतोच.**

**कृ.५. सहसंबंधानुसार योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | पंचतारांकित हॉटेल्स | अ. | भरपूर पाऊस |
| २. | प्रचंड वृक्षतोड | ब. | पाण्याची उधळपट्टी |
| ३. | प्रचंड वृक्ष | क. | पावसाचे प्रमाण कमी |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'मार्च' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'करंटे' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. आजकाल कोणत्या महिन्यापासून प्यायचे पाणी मिळेनासे होते?

२. लेखकाच्या मते पावसाला पळवून लावणारे लोक कसे आहेत?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

अल्प → १

भरपूर → २

**उत्तर:** १. कमी २. प्रचंड

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. काटकसर × [ ] २. प्रश्न × [ ]

**उत्तर:** १. उधळपट्टी २. उत्तर

**कृ.३. शब्दसमूहासाठी एक शब्द द्या.**

अतिथीगृहांसाठी (हॉटेल्ससाठी) असणारा एक उच्च दर्जा : [ ]

**उत्तर:** पंचतारांकित

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. पंच : [ ] [ ]

२. वृक्ष : [ ] [ ]

**उत्तर:** १. पंचरत्न, पंचतारांकित

२. वृक्षवल्ली, वृक्षतोड

क.  माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| पाण्याचा | | | |
| पावसाला | | | |
| देशात | | | |

उत्तर:

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| पाण्याचा | पाण्या | चा | षष्ठी |
| पावसाला | पावसा | ला | द्वितीया / चतुर्थी |
| देशात | देशा | त | सप्तमी |

**कृ.२. खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. पूर्वी    २. अरेरे !

**उत्तर:** १. **पूर्वी**ही दुष्काळ पडत असत.

२. **अरेरे !** काय दशा झाली आहे त्याची.

**कृ.३. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळेच पाऊस येईनासा झाला आहे. **(पूर्ण भूतकाळ करा.)**

**उत्तर:** प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाल्यामुळेच पाऊस येईनासा झाला होता.

२. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे.

**(अपूर्ण भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** पावसाचे प्रमाण कमी होत जाणार.

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

या प्रश्नाचे उत्तर फारसे अवघड नाही.

**(होकारार्थी करा.)**

**उत्तर:** या प्रश्नाचे उत्तर तसे सोपे आहे.

**कृ.५. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. पंचतारांकींत    २. उधळपटी

**उत्तर:** १. पंचतारांकित    २. उधळपट्टी

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. पाऊस कुठे गेला कुणी घालवला हा पाऊस

**उत्तर:** पाऊस कुठे गेला? कुणी घालवला हा पाऊस?

२. आजही जिथं प्रचंड वृक्षं आहेत तिथं भरपूर पाऊस पडतो

**उत्तर:** आजही जिथं प्रचंड वृक्षं आहेत, तिथं भरपूर पाऊस पडतो.

**ड. माझे मत**

**कृ.१. तुमच्या मते पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी काय उपाय करता येतील?**

**उत्तर:** 'पाणी हेच जीवन' असे म्हणतात ते काही खोटे नाही; पण तरीही आपल्याला पाण्याचे मोल पुरेसे कळलेले नाही असे वाटते. आज अनेक ठिकाणी पाण्याचा अपव्यय होताना दिसतो. अनेक हॉटेल्समधून पाणी जास्त प्रमाणात वापरले जाते, तिथे पाण्याचा वापर कमी करणे शक्य आहे. घरकाम करतानाही पाण्याचा अपव्यय होताना दिसतो. कपडे धुताना बादल्यांमध्ये पाणी घेऊन धुवावे. आंघोळ करताना शॉवरचा वापर न करता बादलीतील पाण्याने आंघोळ करावी. रस्त्यात, घरात अथवा परिसरात कोठेही पाण्याचा नळ उघडा दिसल्यास तो बंद करावा. गळके नळ, टाक्या यांतून थेंब थेंब पाणी गळल्याने हजारो लीटर पाणी वाया जात असते. असे नळ, टाक्या वेळीच दुरुस्त कराव्यात. पिण्यासाठी हवे तेवढेच पाणी घ्यावे. झाडांना पाइपने पाणी न घालता बादलीने घालावे. अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे, अनेक लोक पाण्यासाठी तडफडत आहेत, याचे भान ठेवून पाण्याचा कमीतकमी वापर करणे आजच्या काळाची गरज आहे.

**परिच्छेद ६**

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४२-४३ वरील (ओळ ५८ ते ६७) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[आमच्या लहानपणी आमच्या ......................**

**...................... कुणाला फुरसत आहे?]**

**अ. आकलन**

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

**'आडवी खोरी' जंगलाची वैशिष्ट्ये**

↓

१

↓

२

**उत्तर:** १. एवढी दाट झाडी होती, की पुढचा रस्ता शोधणे अवघड जाई.

२. भरदुपारीही वाघ दिसत असे.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**

(१) ← **भेदण्यास कठीण असे चक्र** → (२)

**उत्तर:** १. जंगले नाहीत २. पाऊस नाही

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **बाराहळी गावाकडे जाताना लागणाऱ्या जंगलाचे नाव** → [ ]

२. **दुरून पाहिले तर गाव यांमुळे दिसत नसे** → [ ]

**उत्तर:** १. आडवी खोरी २. झाडांमुळे

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. एखाद्या गावाकडे दुरून पाहिले, तर ते गाव _______

अ. जंगलामुळे दिसत नाही.

ब. झाडांमुळे दिसत नसे.

क. घरामुळे दिसत नसे.

ड. धुक्यामुळे दिसत नसे.

२. ती सारी जंगलं आम्ही _______

अ. कापून टाकली.

ब. संवर्धित केली.

क. नष्ट करून टाकली.

ड. साफ करून टाकली.

**उत्तर:** १. एखाद्या गावाकडे दुरून पाहिले, तर ते गाव **झाडांमुळे दिसत नसे.**

२. ती सारी जंगलं आम्ही **साफ करून टाकली.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. बाराहळी गावाकडे जाताना आडवी खोरी हे जंगल लागायचे.

२. आडव्या खोऱ्यात पुढचा रस्ता शोधून काढणे अवघड होईल, इतके जंगल होते.

३. चार-पाच वर्षांपूर्वी लेखकाला ते आडव्या खोऱ्याचे जंगल नाहीसे झालेले दिसले.

४. जंगले नष्ट झाली, म्हणून पाऊस वेळेवर पडतो.

**उत्तर:** १. सत्य  २. सत्य

३. सत्य  ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'बाराहळी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'वाघ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. कोणत्या गावाकडे जाताना जंगल लागायचं?

२. आडव्या खोरीत भरदुपारी काय पाहायला मिळत असे?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

१. जंगल : [ ] २. ग्राम : [ ]

**उत्तर:** १. वन २. गाव

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. उभी × [ ]

२. असत्य × [ ]

**उत्तर:** १. आडवी २. सत्य

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

जंगल, वृक्ष, गाव, झाडे

**उत्तर:** गाव

**कृ.४. पुढील वाक्यांत दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो वाक्प्रचार योजा.**

**(फुरसत नसणे, चक्र भेदणे)**

१. मोहनने शिक्षण न घेतल्यामुळे नोकरी नव्हती व नोकरी नसल्यामुळे गरिबीच्या संकटातून मार्ग काढता येत नव्हता.

२. सुधीरला कामाच्या गडबडीत स्वत:च्या मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता.

**उत्तर:** १. मोहनने शिक्षण न घेतल्यामुळे नोकरी नव्हती व नोकरी नसल्यामुळे गरिबीचे **चक्र भेदता** येत नव्हते.

२. सुधीरला कामाच्या गडबडीत स्वत:च्या मुलांकडे लक्ष द्यायला **फुरसत नव्हती.**

**कृ.५. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. दुष्ट [ ] वर्ती

२. गाव [ ] दुपारी

**उत्तर:** १. दुष्टचक्र, चक्रवर्ती

२. गावभर, भरदुपारी

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | आमच्या | अ. | प्रथमा |
| २. | खोऱ्यात | ब. | षष्ठी |
| ३. | चक्र | क. | सप्तमी |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.२. खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय शोधून लिहा.**

या आडव्या खोऱ्यात एवढी दाट झाडी होती, की पुढचा रस्ता शोधून काढणे अवघड जात असे.

**उत्तर:** क्रियाविशेषण अव्यय - अवघड

**कृ.३. कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्याचा प्रकार ओळखा.**

**(प्रश्नार्थी, नकारार्थी, विधानार्थी)**

१. तिथं जंगल होतं हेच खरं वाटत नाही.

**उत्तर:** नकारार्थी

२. ती सारी जंगलं आम्ही साफ करून टाकली.

**उत्तर:** विधानार्थी

३. हे चक्र भेदण्याची शक्ती कोणती आहे?

**उत्तर:** प्रश्नार्थी

कृ.४. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.

१. चर्क | चक्र | च्रक | चक्र

२. भरदूपारी | भरदुपारि | भरदुपारी | भरदूपारि

उत्तर: १. चक्र २. भरदुपारी

कृ.५. खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा.

१. त्याला तेव्हा 'आडवी खोरी' म्हणायचे.

उत्तर: १. (' ') – एकेरी अवतरण चिन्ह

२. ( . ) – पूर्णविराम

२. भरदुपारी वाघ पाहायचा असेल, तर तो आडव्या खोऱ्यात दिसलाच म्हणून समजा !

उत्तर: १. ( , ) – स्वल्पविराम

२. ( ! ) – उद्गारवाचक चिन्ह

ड. माझे मत

कृ.१. जंगलतोडीचे पर्यावरणावर होणारे परिणाम लिहा.

उत्तर: वाढत्या लोकसंख्येबरोबरच जंगलतोडीचे, वृक्षतोडीचे प्रमाण वाढत चालले आहे. जंगलतोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. सतत दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. झाडे हवेतील कार्बनडायऑक्साइड शोषून घेत असतात व ऑक्सिजनचा पुरवठा करत असतात; पण झाडे नसल्यामुळे हवेत कार्बनडायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. याचा परिणाम पृथ्वीभोवती असलेल्या ओझोन थरावरही होताना दिसतो आहे. झाडेच नसल्यामुळे

पक्ष्यांना घरटी बांधण्यासाठी जागा मिळत नाही, पर्यायाने पक्ष्यांचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. जंगलतोडीमुळे प्राण्यांची घरे नष्ट होऊ लागल्याने, प्राणी मनुष्यवस्तीत प्रवेश करत आहेत. हे सगळे परिणाम भविष्यासाठी घातक ठरू शकतात; म्हणूनच जंगलतोडीवर बंदी आणायला हवी. वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन प्रकल्प राबवायला हवेत. तरच पृथ्वीवरील जीवन टिकून राहू शकेल.

## सारांश लेखन

**'पाठ फिरवणारा पाऊस' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

## सारांश लेखन

**'पाठ फिरवणारा पाऊस' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

'पाठ फिरवणारा पाऊस' या नागनाथ कोत्तापल्ले लिखित पाठात पावसाच्या आठवणी व पाऊस कमी होण्याची कारणे त्यांनी विशद केली आहेत.

लेखकाचे बालपण रमणीय नसले, तरी बालपणी अनुभवलेला पाऊस मात्र त्यांना रमणीय वाटतो. पावसाची अनेक रूपे त्यांनी अनुभवली. सलग तीन-चार दिवस पडणाऱ्या पावसामुळे येणारा पूर पाहण्यात त्यांना मजा वाटे. आठ-दहा दिवस चालणाऱ्या झडीमुळे पोरांची मजा होत असली तरी मोठ्या माणसांना तो जाचक होत असे. या पावसाच्या आठवणींसोबतच लेखक त्यांनी अनुभवलेल्या दुष्काळाचेही वर्णन करतात. भीषण दुष्काळ, असंख्य कुटुंबांचे स्थलांतर, पावसासाठी केलेल्या निरर्थक प्रार्थना यांचे चित्रण ते करतात. प्यायच्या पाण्याच्या कमतरतेची कारणे देतात. पाऊस कमी झाला, तो बेसुमार वृक्षतोडीमुळे, हे विदारक सत्य सांगतानाच पुढील भविष्यातील पाणीप्रश्नाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.